# मेट्रो ३ : आरे कारशेडच्या कामाचा भिडेंनी घेतला आढावा



छाया : दीपक साळवी

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गिकेच्या आरे कारशेडमध्ये ९ ॲक्वा ट्रेन दाखल झाल्या असून, कारशेडचे काम व मेट्रोचे काम नेमके कसे चालले आहे, याचा आढावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी घेतला. प्रकल्प संचालक सुबोध गुप्ता, कार्यप्रणाली संचालक राजीव हेदेखील या वेळी उपस्थित होते.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाचे भुयारीकरण १०० टक्के पूर्ण झाले असून, पहिल्या टप्प्याचे लोकार्पण नव्या वर्षात करता यावे, यासाठी एमएमआरसीएलने प्रयत्न सुरू केले आहेत. अश्विनी भिडे यांनी आरे कारशेडला भेट दिल्यानंतर आरे स्थानकांची इमारत, ट्रॅक, ऑपरेशन कंट्रोल आणि प्रणाली यांचा आढावा घेतला आहे. सध्या आरे कारशेडमध्ये ९ ॲक्वा ट्रेन दाखल असून, पहिला टप्पा लवकरात लवकर सुरू करण्यासाठी आरे कारशेडच्या कामावर भर देण्यात आला आहे. सध्या मेट्रो ३ चे ७९ टक्के काम पूर्ण असून नोव्हेंबर महिन्यात आरे ते बीकेसीदरम्यान चाचण्या सुरू करण्यात येणार आहेत. या चाचण्या पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय रेल्वे सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच मेट्रोच्या लोकार्पणाची तारीख निश्चित करण्यात येणार आहे. सध्या पहिल्या टप्प्यातील ट्रॅक पूर्णत्वाचे काम सुरू असून, दोन्ही बाजूला ओव्हरहेड वायर्स चार्ज करण्यात येणार आहेत. काही ठिकाणी ट्रॅकचे काम अजूनही अपूर्णावस्थेत असल्याने ट्रायल रन सुरू होणे शिल्लक आहे.